**प्रस्तावना :- भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेली निविदा सुचना क्र.३ टेंडर क्र.१०८२०२८ या निविदेस प्राप्त झालेले निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा दैनंदिन १०० टक्के कचरा संकलन व वहन करणेसाठी विभागामार्फत ई-निविदा सुचना क्र.०३ टेंडर क्र.१०८२०२८ मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दिलेल्या दि.०६/०९/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार दि.०७/०९/२०२४ ते दि.१८/०९/२०२४ या कालावधी करिता http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कालावधीत सण, उत्सव व इतर कारणास्तव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.१६/०९/२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार सदर निविदेस दि.१९/०९/२०२४ ते दि.२५/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असता याकामी ३ निविदाकार प्राप्त झाले असल्याचे संगणक विभागाच्या दि.२५/०९/२०२४ रोजीच्या अहवालात निदर्शनास आले होते.

प्रभाग समिती क्र.०१ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेस प्राप्त ३ निविदाकार यांनी निविदेच्या अटी शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्ततेची तपासणी नियुक्त तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांचे मार्फत करण्यात आली असुन नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी दि.०२/१०/२०२४ रोजी दिलेले अहवालाच्या अनुषंगाने मा. निविदा समितीने दिलेल्या मान्यतेनुसार प्राप्त तिन्ही निविदाकार पात्र ठरविण्यात आले असता महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ मधील प्रकरण-४ मुद्दा क्र.४.४.३.१ मधील तरतुदीनुसार पात्र ३ निविदाकार यांचे आर्थिक बोलीचा लिफाफा-२ (फायनानशियल) खुले करण्यात आले असता खालील तक्त्या प्रमाणे त्यांनी दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | प्राप्त निविदाकाराचे नाव | तांत्रिक दृष्ट्या पात्र / अपात्र | सादर केलेला एकुण खर्च | प्राप्त लघुत्तम दर (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| १ | **मे. व्ही डी के फॅसिलिटी सर्विसेस** | पात्र | रु.४९,००,०००/- | **L1(-19.76%)** |
| २ | **मे. नितीन देवराव बनसोड** | पात्र | रु.५१,००,०००/- | **L2(-14.50%)** |
| ३ | मे. चंडिका एंटरप्रायजेस, भिवंडी | पात्र | रु.५२,१५,५००/- | L3(-14.62%) |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०१ च्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी मे. व्ही डी के फॅसिलिटी सर्विसेस, पुणे यांनी सर्वात कमी दराची निविदा रक्कम रु.४९,००,०००/- मात्र भरली असुन सदरचे प्राप्त दर हे निविदेतील अंदाजपत्रकिय रक्कमेच्या रु.१२,०८,३३३/- इतकी कमी भरली आहे.

परंतू मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.१४/११/२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार मे. व्ही डी के फॅसिलिटी सर्विसेस, पुणे यांच्या विरुद्ध प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करुन अहवाल सादर केले असता मे. व्ही डी के फॅसिलिटी सर्विसेस, पुणे यांना अपात्र करण्यात आले असुन मे. नितीन देवराव बनसोड L2 निविदाकार यांना L1 दरात कार्यादेश देणेकामी मान्यता दिली आहे.

तथापि, निविदा अटी शर्तीनुसार नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी ३ वर्षासाठी होणाऱ्या खर्चाचा अहवाल सादर केला असुन सदरचा खर्च खालील तक्त्या प्रमाणे आहे.

Annexture –I ZONE -1

| Sr No. | Detail | 1st year | 2nd Year | 3rd Year |
|---|---|---|---|---|
| 1 | Estimated Project Cost | 6107000/- | | |
| 2 | L1 Cost | 4900000 | 5145000 | 5402250 |
| 3 | Tender % below | 19.76% | 19.76% | 19.76% |
| 4 | Total Project cost for 1st year | 5,88,00,000.00 | 6,17,40,000.00 | 6,48,27,000.00 |
| 5 | Performance security 3 year Bank Garrenty 3% | 65,95,000.00 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | Additional Security Deposit in % | 15.52% | 15.52% | 15.52% |
| 7 | Additional Security Deposit in Rs. | 91,25,760.00 | 95,82,048/- | 1,00,61,150/- |
| 8 | Total Security Deposit | 1,57,20,760.00 | 95,82,048/- | 1,00,61,150/- |
| 9 | Stamp Duty for Agreement 3 year | 1,84,000/- | - | - |

उपरोक्त तक्त्याच्या अनुषंगाने ३ वर्षांसाठी होणाऱ्या खर्चास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणेकामी प्रशासकिय ठराव घेणेस विनंती आहे.

**प्रशासकिय ठराव क्र. :-** ६९१ **दिनांक :-** ३० / ११ /२०२४

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०१ च्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी मे. व्ही डी के फॅसिलिटी सर्विसेस, पुणे यांनी रु.४९,००,०००/- असे सर्वात कमी दराची निविदा सादर केली असुन मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.१४/११/२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार मे. व्ही डी के फॅसिलिटी सर्विसेस, पुणे यांच्या विरुद्ध प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करुन अहवाल सादर केले असता मे. व्ही डी के फॅसिलिटी सर्विसेस, पुणे यांना अपात्र करण्यात आले असुन मे. नितीन देवराव बनसोड L2 निविदाकार यांना L1 दरात कार्यादेश देणेकामी मान्यता दिली आहे. सर्वात कमी दरात मे. नितीन देवराव बनसोड L2 निविदाकार यांना व त्यांनी सादर केलेल्या खर्चास व नियुक्त तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांनी प्राप्त दराच्या अनुषंगाने विभागाने प्रस्तावनेत प्रस्तावित केलेल्या तीन वर्षासाठी होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेकामी मनपाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सुचना क्र.०३ टेंडर क्र.१०८२०२८ मध्ये मे. व्ही डी के फॅसिलिटी सर्विसेस, यांनी रु.४९,००,०००/- सर्वात कमी दर सादर केले असुन मे. व्ही डी के फॅसिलिटी सर्विसेस, पुणे यांच्या विरुद्ध प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करुन अहवाल सादर केले असता मे. व्ही डी के फॅसिलिटी सर्विसेस, पुणे यांना अपात्र करण्यात आले असुन मे. नितीन देवराव बनसोड L2 निविदाकार यांना L1 मनपाच्या अंदाजपत्रकिय रक्कमेच्या रु.१२,०८,३३३/- (रु.४९,००,०००/-) कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) नुसार मे. एन डी बनसोड, भांडूप या ठेकेदार संस्थेसमवेत करारनामा करुन कार्यादेश देणे कामी व आवश्यकतेनुसार बदल करणेकामी अधिकार राखुन ठेवुन यासाठी उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे ३ वर्षाकरिता होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
O/c (HO) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

**प्रस्तावना :- भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेली फेर ई-निविदा सुचना क्र.१० टेंडर क्र.११०४९६५ या निविदेस प्राप्त झालेले निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा दैनंदिन १०० टक्के कचरा संकलन व वहन करणेसाठी विभागामार्फत ई-निविदा सुचना क्र.१० टेंडर क्र.११०४९६५ मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दिलेल्या दि.०६/०९/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार दि.०७/०९/२०२४ ते दि.१८/०९/२०२४ या कालावधी करिता http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर कालावधीत सण, उत्सव व इतर कारणास्तव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.१६/०९/२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार सदर निविदेस दि.१९/०९/२०२४ ते दि.२५/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असता याकामी २ निविदाकार प्राप्त झाले असल्याचे संगणक विभागाच्या दि.२५/०९/२०२४ रोजीच्या अहवालात निदर्शनास आले होते. त्याअनुषंगाने आत्यावश्यक सेवा व विधासभा निवडणूक २०२४ ची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता पाहता सदर निविदेस दि.२६/०९/२०२४ ते ३०/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असता संगणक विभागाचे दि.३०/०९/२०२४ रोजीचे प्राप्त अहवालानुसार सदर निविदेस ५ निविदाकार प्राप्त झाले होते.

प्रभाग समिती क्र.०४ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेस प्राप्त ५ निविदाकार यांनी निविदेच्या अर्टी शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्ततेची तपासणी नियुक्त तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांचे मार्फत करण्यात आली असुन नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी दि.०३/१०/२०२४ रोजी दिलेले अहवालाच्या अनुषंगाने प्राप्त ५ निविदाकार अपात्र ठरविण्यात आले असता महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ मधील प्रकरण-४ मुद्दा क्र.४.४.३.१ मधील तरतुदीनुसार प्रभाग समिती क्र.४ करिता फेर ई-निविदा सुचना क्र.१० टेंडर क्र.११०४९६५ प्रसिद्ध करण्यात आली असता संगणक विभागाचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे प्राप्त अहवालानुसार त्याकामी २ निविदाकार प्राप्त झाले होते.

तथापि, वर नमुद शासन निर्णयानुसार मुदतवाढ देवून सुद्धा ३ पेक्षा कमी निविदाकारांचा प्रतिसाद मिळाल्याने आत्यावश्यक बाब म्हणून व पुढील काळात विधानसभा निवडणूक २०२४ ची आचार संहिता लागू होण्याची शक्यता पाहता प्राप्त २ निविदाकारांचे मा. उप-आयुक्त सो. (आरोग्य) यांनी दि.११/१०/२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार प्राप्त निविदाकारांचे लिफाफा-१ उघडून निविदाकारांनी निविदेच्या अटी शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्ततेची तपासणी नियुक्त तांत्रिक सल्लागार यांचे मार्फत करण्यात आली असुन त्यांनी दि.१४/१०/२०२४ रोजी दिलेल्या अहवालानुसार प्राप्त दोन्ही निविदाकार पात्र होत असुन मा. निविदा समितीच्या मान्यतेने पात्र २ निविदाकार यांचे आर्थिक बोलीचा लिफाफा-२ (फायनानशियल) खुले करण्यात आले असता खालील तक्त्या प्रमाणे त्यांनी दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | प्राप्त निविदाकाराचे नाव | तांत्रिक दृष्ट्या पात्र / अपात्र | सादर केलेला एकुण खर्च | प्राप्त लघुत्तम दर (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| १ | **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** | पात्र | **रु.४९,००,०००/-** | **L1(-4.98%)** |
| २ | मे. अचिंत्य कन्सट्रक्शन कंपनी | पात्र | रु.५०,८०,११७.१६ | L2(-1.49%) |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०४ च्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स, भिवंडी यांनी सर्वात कमी दराची निविदा रक्कम रु.४९,००,०००/- मात्र भरली असुन सदरचे प्राप्त दर हे निविदेतील अंदाजपत्रकिय रक्कमेच्या रु.२,५७,०००/- इतकी कमी भरली असुन निविदा अटी शर्तीनुसार नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी ३ वर्षासाठी होणाऱ्या खर्चाचा अहवाल सादर केला असुन सदरचा खर्च खालील तक्त्या प्रमाणे आहे.

Annexture –I ZONE -4

| Sr No. | Detail | 1st year | 2nd Year | 3rd Year |
|---|---|---|---|---|
| 1 | Estimated Project Cost | 5157000/- | | |
| 2 | L1 Cost | 4900000/- | 5145000/- | 5402250/- |
| 3 | Tender % below | 4.98% | 4.98% | 4.98% |
| 4 | Total Project cost for 1st year | 58800000/- | 61740000/- | 64827000/- |
| 5 | Performance security 3 year Bank Garrenty 2% | 55,70,000/- | | |
| 6 | Additional Security Deposit in | 1.00% | 1.00% | 1.00% |
| 7 | Additional Security Deposit in Rs. | 588000/- | 617400/- | 648270/- |
| 8 | Total Security Deposit | 61,58,000/- | - | - |
| 9 | Stamp Duty for Agreement 3 year | 1,84,000/- | - | - |

उपरोक्त तक्त्याच्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणेकामी प्रशासकिय ठराव घेणेस विनंती आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ६९२ **दिनांक :-** ३० / ११ /२०२४

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०४ च्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी **मे. बुबेरे असोसिएट्स, भिवंडी** यांनी रु.४९,००,०००/- असे सर्वात कमी दराची निविदा सादर केली असुन सर्वात कमी दर सादर केलेले निविदाकार यांना व त्यांनी सादर केलेल्या खर्चास व नियुक्त तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांनी प्राप्त दराच्या अनुषंगाने विभागाने प्रस्तावनेत प्रस्तावित केलेल्या तीन वर्षासाठी होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेकामी मनपाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स, भिवंडी यांनी रु.४९,००,०००/- सर्वात कमी दर सादर केले असुन मनपाच्या अंदाजपत्रकिय रक्कमेच्या रु.२,५७,०००/- कमी दराच्या (रु.४९,००,०००/-) निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) नुसार मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स, भिवंडी या ठेकेदार संस्थेसमवेत करारनामा करुन कार्यादेश देणे कामी व आवश्यकतेनुसार बदल करणेकामी अधिकार राखुन ठेवुन यासाठी उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे ३ वर्षाकरिता होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

O/C HO

**प्रस्तावना :- भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेली फेर ई-निविदा सुचना क्र.९ टेंडर क्र.११०१५०५ या निविदेस प्राप्त झालेले निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा दैनंदिन १०० टक्के कचरा संकलन व वहन करणेसाठी विभागामार्फत फेर ई-निविदा सुचना क्र.०९ टेंडर क्र.११०१५०५ मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दिलेल्या दि.०६/०९/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार दि.०७/०९/२०२४ ते दि.१८/०९/२०२४ या कालावधी करिता http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर कालावधीत सण, उत्सव व इतर कारणास्तव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.१६/०९/२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार सदर निविदेस दि.१९/०९/२०२४ ते दि.२५/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असता याकामी ३ निविदाकार प्राप्त झाले असल्याचे संगणक विभागाच्या दि.२५/०९/२०२४ रोजीच्या अहवालात निदर्शनास आले होते.

प्रभाग समिती क्र.०५ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेस प्राप्त ३ निविदाकार यांनी निविदेच्या अटीं शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्ततेची तपासणी नियुक्त तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांचे मार्फत करण्यात आली असुन नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी दि.०२/१०/२०२४ रोजी दिलेले अहवालाच्या अनुषंगाने प्राप्त तीन्ही निविदाकार अपात्र ठरविण्यात आले असता महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ मधील प्रकरण-४ मुद्दा क्र.४.४.३.१ मधील तरतुदीनुसार प्रभाग समिती क्र.५ करिता फेर ई-निविदा सुचना क्र.९ टेंडर क्र.११०१५०५ प्रसिद्ध करण्यात आली असता त्याकामी ३ निविदाकार प्राप्त झाले असता नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी दि.११/१०/२०२४ रोजी दिलेल्या अहवालानुसार प्राप्त ३ निविदाकारांपैकी २ निविदाकार पात्र होत असुन मा. निविदा समितीच्या मान्यतेने पात्र २ निविदाकार यांचे आर्थिक बोलीचा लिफाफा-२ (फायनानशियल) खुले करण्यात आले असता खालील तक्त्या प्रमाणे त्यांनी दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | प्राप्त निविदाकाराचे नाव | तांत्रिक दृष्ट्या पात्र / अपात्र | सादर केलेला एकुण खर्च | प्राप्त लघुत्तम दर (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| १ | **मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर** | **पात्र** | **रु.४५,७९,७०४/-** | **L1(-9.99%)** |
| २ | मे. आदर्श सर्विसेस, नाशिक | पात्र | रु.४७,७५,४७४/- | L2(-7.4%) |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०५ च्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर यांनी सर्वात कमी दराची निविदा रक्कम रु.४५,७९,७०४/- मात्र भरली असुन सदरचे प्राप्त दर हे निविदेतील अंदाजपत्रकिय रक्कमेच्या रु.५,०८,२९६/- इतकी कमी भरली असुन निविदा अटी शर्तीनुसार नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी ३ वर्षासाठी होणाऱ्या खर्चाचा अहवाल सादर केला असुन सदरचा खर्च खालील तक्त्या प्रमाणे आहे.

Annexture –I ZONE -5

| Sr No. | Detail | 1st year | 2nd Year | 3rd Year |
|---|---|---|---|---|
| 1 | Estimated Project Cost | 5088000/- | | |
| 2 | L1 Cost | 45,79,704/- | 48,08,689.20/- | 50,49,123.66/- |
| 3 | Tender % below | 9.99% | 9.99% | 9.99% |
| 4 | Total Project cost for 1st year | 5,49,56,448.00 | 5,77,04,270.40 | 6,05,89,483.92 |
| 5 | Performance security 3 year Bank Garrenty 2% | 54,96,000/- | | |
| 6 | Additional Security Deposit in | 1% | 1% | 1% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | Additional Security Deposit in Rs. | 5,49,564.48/- | 5,77,042.70/- | 6,05,894.84/- |
| 8 | Total Security Deposit | 60,45,564/- | - | - |
| 9 | Stamp Duty for Agreement 3 year | 1,72,000/- | - | - |

उपरोक्त तक्त्याच्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणेकामी प्रशासकिय ठराव घेणेस विनंती आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ८९३

**दिनांक :-** ३०/११ /२०२४

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.०५ च्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी **मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर** यांनी रु.४५,७९,७०४/- असे सर्वात कमी दराची निविदा सादर केली असुन सर्वात कमी दर सादर केलेले निविदाकार यांना व त्यांनी सादर केलेल्या खर्चास व नियुक्त तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांनी प्राप्त दराच्या अनुषंगाने विभागाने प्रस्तावनेत प्रस्तावित केलेल्या तीन वर्षासाठी होणाऱ्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,** घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करणेकामी मनपाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर फेर ई-निविदा सुचना क्र.०९ टेंडर क्र.११०१५०५ मध्ये मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर यांनी रु.४५,७९,७०४/- सर्वात कमी दर सादर केले असुन मनपाच्या अंदाजपत्रकिय रक्कमेच्या रु.५,०८,२९६/- कमी दराच्या (रु.४५,७९,७०४/-) निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) नुसार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर या ठेकेदार संस्थेसमवेत करारनामा करुन कार्यादेश देणे कामी व आवश्यकतेनुसार बदल करणेकामी अधिकार राखुन ठेवुन यासाठी उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे ३ वर्षाकरिता होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**